# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ


कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : *director.boee@unigug.ac.in*


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ 1448 /२०२६

दिनांक : 22/०५/२०२६

## अधिसुचना

### विषय:– शैक्षणिक सत्र २०२६–२७ करीता प्रवेशासंबंधी सुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विभागप्रमुख व विद्यार्थी तसेच संबंधीतांना सुचित करण्यात येते की, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंबंधी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चे **Academic Calender** संदर्भ क्र. **No/GUG/Acad./1670/2026** दिनांक ०४/०५/२०२६ नुसार विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्याची प्रक्रिया संलग्नित महाविद्यालयांना **Online** प्रणालीव्दारे **unigug.ac.in** या संकेतस्थळावर ई–समर्थ पोर्टलवर **Admission** २०२६–२७ या टॅबवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ०८/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत पुर्ण करावी. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास व काही अडचण निर्माण झाल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

१) प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देत असताना विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमनिहाय व **NEP** संदर्भात विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचनानुसार अचुक विषय निवडले आहेत किंवा नाही याची खात्री करावी.

२) विद्यार्थी/विद्यार्थीनीचे **ABC/APAAR Id**, पूर्ण नाव (इंग्रजी व मराठी), आईचे नाव, जन्म तारीख, मतदार नोंदणी क्रमांक, आधार क्रमांक, जात, लिंग, माध्यम, मोबाईल नंबर व पत्ता याची अचुक नोंद करावी.

३) सेमीस्टरची निवड तसेच शैक्षणिक वर्ष अचुक नोंदवावी.

४) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता ईतर विद्यापीठाचे स्थानंतरण प्रमाणपत्र व या विद्यापीठाचे योग्यता प्रमाणपत्र स्विकारून व पडताळणी करूनच विद्यार्थ्याचे प्रवेश निश्चीत करण्यात यावे.

५) अभ्याक्रमानुसार मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील.

६) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास विनंती अर्ज प्राचार्य मार्फत सादर करून विद्यापीठाकडुन प्रवेश रद्द करून घ्यावा.

७) विद्यापीठाचे निदेश (**Direction**),परीपत्रके, अधिसुचनानुसारच आवश्यक कागदपत्राची (**Documents**) तपासणी करून नियमानुसार विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यात यावा. चुकीचे प्रवेश देण्यात आल्यास नामांकन केल्या जाणार नाही. यांची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

टिप:–प्रवेशित विद्यार्थ्यांचा **ABC ID** नमुद करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर **ABC/APAAR Id**, चुकीची टाकल्यास भविष्यात होणाऱ्या अडचणीस महाविद्यालय जबाबदार राहील.

22/05/2026

(डॉ. धनराज पाटील)
संचालक (प्र.) परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:–

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२. मा. प्र–कुलगुरू महोदय, यांचे कार्यालय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
५. मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित सर्व महाविद्यालय यांना कार्यवाहीस्तव सादर.
६. उपकुलसचिव, परीक्षा पुर्व/उपरांत, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
७. उपकुलसचिव,महाविद्यालयीन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
८. संगणक विभाग प्र[illegible]

Scanned by Camera Scanner